## प्रकरण ४ थे

# 'मृत्युदंड' या कादंबरीतील सामाजिक जीवन व वाङ्मयीन वैशिष्ट्ये

'मृत्युदंड' मधील समाजजीवन

कौटुंबिक वातावरण

धार्मिक वातावरण

जैन संस्कृती व समाज

पुरूषप्रधान संस्कृती

कुष्ठरोग्यांचे जीवन चित्रण

कुष्ठरोग्यांच्या संततीचा प्रश्न

स्त्रीवादी लेखन

समाजाकडून स्त्रीला दिली जाणारी वागणूक

स्त्री–शोषिकता

स्त्री-मानसिकता

जुनी पिढी व नवी पिढी संघर्ष

वाङ्मयीन वैशिष्ट्ये

कथानक

व्यक्तिरेखा

भाषाशैली

वातावरणनिर्मिती

निवेदनशैली

समारोप

## प्रकरण ४ थे

## 'मृत्युदंड' या कादंबरीतील सामाजिक जीवन व वाङ्मयीन वैशिष्ट्ये

साहित्य म्हणजे मानवी मनोव्यापारात वसलेली एक सृष्टी असते. साहित्यिक सभोवताली घडणाऱ्या घटनांचे आपल्या संवेदनशील निरीक्षणाच्या वलयात अनुभवाच्या परिघात अर्थ लावीत असतो. तो घटनाप्रसंग भावलेल्या व्यक्ती यांच्यावर कल्पकतेचा साज चढवून शब्दरूपात आपल्या साहित्यात जिवंत करीत असतो.

नीलम माणगावे यांचा 'मृत्युदंड' ही कादंबरी सुकृत प्रकाशन, सांगली जून २००६ साली प्रकाशित कादंबरीची पृष्ठसंख्या १९२ आहे. या कादंबरीत स्त्रीची दु:ख, वेदना, कुष्ठरोगी लोकांचे, त्यांच्या मुलांचे प्रश्न, समस्या, दु:ख चित्रित झालेले आहे. तसेच कौटुंबिक, धार्मिक, सामाजिक वातावरण, पुरूषप्रधान संस्कृती, नायिकेचे विविध अनुभव इ. बरोबर कुष्ठरोग्यांचे जीवनचित्रण, जैन संस्कृतीचे चित्रण यांचा या कादंबरीतील वाङ्मयीन वैशिष्ट्यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

### 'मृत्युदंड' मधील समाजजीवन

'मृत्युदंड' कादंबरीतील आशय हा प्रगल्भ सामाजिक जाणिवा व्यक्त करणारा आहे. लेखक ज्या समाजात वावरतो, मोठा होतो त्याचे दर्शन तो आपल्या लेखनातून घडवतो. नीलम माणगावे या जैनधर्मीय असल्याने त्यांच्या लेखनात जैन धर्माविषयीचे लेखन आलेले दिसते. जैन लोकांचे धार्मिक विचार, त्यांचे दैवत, पूजनीय ग्रंथ, व्हासा, पण्डित इ. विविध संदर्भ या कादंबरीत आलेले आहेत. त्याचबरोबर विमलाबाईंचा छळ करणारा नवरा, त्यांच्या त्रासातून सुटका करून घेण्यासाठी त्यांनी काढलेला मार्ग, त्यांचे विचार या कादंबरीत आलेले दिसतात.

### कौटुंबिक वातावरण

नायिका विमलाबाई आणि त्यांचे पती कमलाकर या दाम्पत्यांना झालेली अजय, विजय व सुरेश ही त्यांची मुले व तसेच त्यांच्या बायका अनुक्रमे सारिका, निला व संध्या असे हे मोठे कुटुंब आहे. कमलाकरांचा स्वभाव विक्षिप्त असल्याने त्याला कंटाळून अजय,

विजय कमवू लागल्याबरोबर दूर रहायला गेले. कमलाकर, विमलाबाई, सुरेश, संध्या, शैलेश, दिपा ही सर्व एकत्र राहतात.

कमलाकर मानसशास्त्राचे प्राध्यापक असल्याने घरात आर्थिक सुबत्ता आहे. गाडी बंगला आहे पण स्वभावाने ते विचित्र, आपमतलबी, विक्षिप्त, तिरसट आहेत. छोट्या-छोट्या कारणांवरुन ते ओरडतात, भांडतात. त्यामुळे घरातील सर्वजण अबोल बनले आहेत. त्यांच्याशी वाद घालून, उलट बोलूनही फायदा नाही हे सर्वांना चांगले माहित असल्याने सर्वजण निमूटपणे ऐकणे यापलिकडे काहीही करीत नाहीत. पण त्यांच्या वागण्याचा सर्वांनाच त्रास होतो. या कुटुंबात त्यांचाच हुकूम चालतो त्यामुळे इतरांना व्यक्तिस्वातंत्र्य नाही.

कमलाकर बाहेरून घरात येणार म्हटल्यावर घरातील सर्वजण धास्तावलेले असतात. घरात एकप्रकारे भीतीचे वातावरण असते. मुले नेहमी भेदरलेली असतात. विमलाबाईंना घरात खेळीमेळीचे वातावरण असावे असे वाटते. पण तसे कधीच घडत नाही. "त्यांच्या फटकून वागण्यानं घर नेहमी धास्तावलेलं जाणवायचं. मोठ्या झाडाखाली लहान झाडं खुरटतात त्यांची चांगली वाढ होत नाही. निरोगी मनानं ती डोलत नाहीत. नेमकं तसंच मुलांच झालं. मोठी होईपर्यंत त्यांनी ते सहन केलं आणि पंख फुटताच, दाण्या-पाण्याची सोय होताच त्यांनी घर सोडलं."[१] असे विमलाबाई आपले मन व्यक्त करतात. अजय हैद्राबादला आणि विजय दिल्लीला राहतात. वर्ष-दोन वर्षातून पावण्यासारखी घरी येतात. त्यांच्यात भावनिक ओढ, आनंद नाही. सुरेश व संध्या ही खूपच समंजस आहेत. त्यामुळे घराचे घरपण टिकून राहिले आहे. विमलाबाई चाळीस वर्षांच्या संसारानंतर वेगळं राहण्याचा निर्णय घेतात या कारणावरून घरात वाद होतो. कमलाकर व शैलेश यांचा एकमेकांवर खूप जीव आहे.

विमलाबाई स्वतंत्र राहिल्यानंतर त्याचा सर्वात जास्त त्रास संध्याला होतो. कमलाकर संध्या व सुरेशवर चिडतात, कसेही बोलतात तेंव्हा आम्ही काहीही आई नाही काही ऐकून घ्यायला तुमचं सहन करायला असे उत्तर देत असल्याने ते फार चिडतात. कमलाकरांच्या चिडखोर स्वभावामुळे घरात सतत वाद होताना दिसतात.

विमलाबाई वारल्यानंतर कमलाकरांना खूप पश्चाताप होतो. धनंजय, मुलं, नातवंड, सुना सर्व एकत्र येतात. अजय, विजय व त्यांच्या बायका सुरेश संध्याला घालून-पाडून बोलतात. त्याचा सुरेश व संध्याला राग येतो. सुरेश फार बोलत नाही पण संध्या त्यांना वस्तुस्थितीची जाणीव करून देते.

लेखिका लिहितात, ''आईकडे लक्ष द्यायची तुझी जबाबदारी नव्हती का? काय केलंस तू? ... निदान आम्हाला तरी सांगायचं. आम्ही नेलं असतं तिला. अजय विजयच्या बोलण्याचा रोख असायचा.''[२]

सुरेश समजूतदारपणे वागत असे. घरातील दु:खी वातावरणाचे भान असल्याने ही भांडणाची वेळ नाही हे तो समजून होता. पण तरीही कुटुंबात तणावग्रस्त वातावरण निर्माण होताना दिसते.

शेवटी कमलाकर सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्याकडे कोणी फारसे लक्ष देत नव्हते. त्यांना वेळेवर चहा, नाष्टा, जेवण मिळेना पण त्यांनी ते खाल्ले की नाही याबद्दल कोणी विचारपूस करत नसे. नातवंड मोठी झाली होती. कॉम्प्युटर आणि चॅनेल्सच्या युगात त्यांच्याजवळ आजोबांकडे पहायला वेळ नव्हता. प्रत्येकजण आपापल्या विश्वात रममाण झाला होता. कमलाकर भ्रमिष्टासारखे वागू लागले. अशाप्रकारे विमलाबाई गेल्यानंतर घरातील वातावरण पूर्ण बदलून गेल्याचे दिसते.

नीलम माणगावे खेळीमेळीचे, तणावग्रस्त कौटुंबिक वातावरण निर्माण करण्यात यशस्वी झाल्याचे दिसतात. कुटुंबातील नातेसंबंध, मानवी भाव-भावना, आई-मुलगा, सासू-सुन, बहीण-भाऊ, आजी-आजोबा, नातवंड यांच्यातील नातेसंबंध उलगडण्यात त्यांना यश आलेले आहे असे दिसते.

## धार्मिक वातावरण

'मृत्युदंड' कादंबरीच्या नायिका विमलाबाई या जैन समाजातील असल्याने या कादंबरीत जैनांचे धार्मिक वातावरण आले आहे. त्या उठता-बसता अरिहंत, भगवंता म्हणतात. तसेच वेगळे राहिल्यानंतर तर स्वत:चा खूपसा वेळ देव-धर्म, पूजा-अर्चा,

स्वाध्याय, जप जाप्य, उपवास यात घालवताना दिसतात. तसेच या कादंबरीत द्रोपदी, सती-सावित्री, यांचाही उल्लेख आढळतो.

विमलाबाईंची मुले अजय-विजय वेगळं राहायचं असेल व देवधर्म करायचा असेल तर बाहुबली, स्तवानीधी, शेडवाळ, कुंथलगिरी, कारंजा या तीर्थक्षेत्री जायला सांगतात. पण याठिकाणी गेलेल्या व्यक्तींना त्या कितीही आजारी असल्या तरी सोडून काम करायला लागते. हे माहीत असल्याने त्या तेथे जाण्यास तयार होत नाहीत. त्यांना मूर्तीची पूजा करायची असते. प्लॅस्टीकच्या मूर्तीची पूजा करता येत नाही. म्हणून त्या धनंजयने दिलेल्या पंचधातूची प्रतिष्ठापना केलेल्या मूर्तीची पूजा करतात. त्यांची देवावर श्रध्दा आहे. रोजच देवपूजा केल्यानंतर त्यांना शक्ती मिळते. प्रसन्न वाटते. ‘‘देवाची आपल्याला साथ आहे, तो आपल्याला मदत करतो, संकटातून सुटका करण्यासाठी प्रयत्नांच्या रूपाने तो बरोबर असतो.’’[३] अशाप्रकारे देवाविषयी आपले विचार त्या व्यक्त करताना दिसतात.

कर्मकांड करणे, देवदेव करणे, धार्मिकतेच्या अहंकारापोटी इतरांचा विचार न करणे म्हणजे धर्म नसून दया म्हणजे धर्म, दीनदुबळ्यांची सेवा करणे म्हणजे धर्म, असा अर्थ माणगावे सांगतात. त्या धर्माविषयीचे पारंपरिक विचार मांडताना दिसत नाहीत. मंदिराला पूजा, यज्ञ, उत्सव, जत्रा इत्यादीसाठी लाखो रूपये खर्च करण्यापेक्षा गोरगरीबांना खर्ची पडले तर सत्कारणी लागतील असे विमलाबाईंना वाटते. कुष्ठरोगी वसाहतीतील लोक देव मानतच नाहीत. कुष्ठरोग्यांचे दु:ख पाहून विमलाबाईना देव आहे की नाही याबद्दल शंका वाटते, ‘‘ तू करूणेचा सागर, तुला दयेचा सागर म्हणतो आम्ही पण नाही! दया, करूणा, तर राहिलीच तुझ्या अस्तित्वाविषयी शंका वाटते रे! आहेस ना तू?’’[४]

विमलाबाई नेहमी संकटाच्यावेळी देवाचा धावा करताना दिसतात. छातीत कळ आली असताना, मरण डोळ्यासमोर आले असताना त्या वैद्याला न बोलावता देवासमोर बसून णमोकार मंत्राचा जप करत राहतात. परमेश्वराशी संवाद साधताना दिसतात. अशाप्रकारे ‘मृत्युदंड’ कादंबरीतील धार्मिक वातावरण दिसून येते.

**जैन संस्कृती व समाज**

'मृत्युदंड' ही सामाजिक कादंबरी जैन धर्माच्या पार्श्वभूमीवर लिहीलेली आहे. या कादंबरीतील कुटुंब हे जैन असल्याने त्यामध्ये जैन संस्कृतीचे दर्शन घडते. व्हासा, चरू, पण्डीत, णमोकार मंत्र इत्यादी शब्द नेहमी येताना आढळतात. जैन धर्मामध्ये व्हासा म्हणजे सुर्यास्तापूर्वीचे जेवण होय. जैन लोकांनी रात्रीचे जेवण त्याज्य मानले आहे. विमलाबाई देवाला अष्टक करतात नंतर खडीसाखर व शेंगदाणे असा प्रसाद वाटतात. अष्टक म्हणजे अष्ट द्रव्यांनी केलेली देवाची आराधना होय. 'मृत्युदंड' कादंबरीत जैन कथा अध्यायनाचा संदर्भ आल्याचा आढळतो. मैनासुंदरीचे आख्यान प्रवचनासाठी लावले असताना सर्वजण ध्यान देवून ऐकतात. विमलाबाईंच्याकडे रोज पण्डित हलदारी, चरू किंवा भाजी-भाकरी इत्यादी मागण्यासाठी येत असतो. पण्डित म्हणजे मंदीरातील पुजारी होय. हा घरोघरी फिरून हलदारी, चरू मागत असतो. हलदारी म्हणजे देवाचा अभिषेक करण्यासाठी जे दूध लागते ते फिरून घरोघरी गोळा करणे होय. देवाला दाखवल्या जाणाऱ्या नैवेद्याला जैन लोक चरू म्हणतात. तसेच त्यांच्यात मंदीराला बस्ती म्हणतात.

वारकरी पायी वारी करीत पंढरपूरला जातात. तेव्हा जाताना जी गावे लागतात त्या गावातील लोक त्यांना जेवण करून घालतात. वारकरी जेवायला येणार याचा जेवण असेल त्यांना खूप आनंद मिळत असतो. जैन समाजात देखील मुनीसंघ असतो. ते आपल्या गवात येणार म्हटल्यावर त्यांना घरात बोलावून जेवण घालण्यात जैनांना समाधान मिळते. कुंथलगिरीहून श्रवणबेळगोळला जाण्यासाठी निघालेला एक मुनीसंघ दोन दिवसासाठी विमलाबाईंच्या गावात येतो तेंव्हा त्या त्यांच्यासाठी चौका तयार करतात. चौका म्हणजे मुनींच्या आहारासाठी केलेल्या सोवळ्याच्या स्वयंपाकाची सिध्दता होय. चौका केल्यानंतर मंदिरात पाणी ठेऊन आल्यानंतर पडघावणे करावयाचे असते. शुध्दी सांगून मुनींना आहारासाठी घरी आणणे म्हणजे पडघावणे होय. मुनींना जेवण देण्याची ही विशिष्ट पद्धत सर्व जैन अवलंबताना दिसतात.

विमलाबाई उठता बसता अरिहंत, भगवंता म्हणतात. तसेच णमोकार मंत्राचा जप करतात. णमो अरिहंताण। णमो सिध्दानं। , णमो अपरियाण।, णमो उवज्झायाणं नमो लोपु सबसाहुणं णमोकार। मंत्र आहे. जैन लोक अत्यंत श्रध्देने हा मंत्र जपतात. जैन धर्मात रत्नकरंडक श्रावकाचा तसेच भक्तामरस्तोत्र महत्त्व आहे. हिंदू समाजातील मारूती स्तोत्र, गणपती स्तोत्र ज्याप्रमाणे महत्त्वाचे मानले जाते त्याप्रमाणे जैन समाजात हे स्तोत्र महत्त्वाचे मानले जाते.

लेखिका जैन समाजाची आणखी एक खासियत सांगतात. कोणत्याही कार्यक्रमासाठी उदा. बाळंतपण एखाद्या गरीब किंवा श्रीमंत मुलीने जे काही आणले असेल ते गावाला दाखवायचे म्हणजे त्यात काही कमी जास्त असेल तर ते हेरून बायका आपल्या सुनांना जाणवून देतात. उपवर मुलींना सासरी येताना सोबत काय आणायचे याचे मार्गदर्शन मिळते. जैन समाजातील लोक कांदा व लसूण खात नाहीत. पण आजकाल काहीजण हे पाळत नाहीत. यावरून बदलत्या काळानुसार बदलणाऱ्या समाजमनाची कल्पना येते. नीलम माणगावे स्वत: जैन असल्याने त्यांच्या मृत्यूदंड कादंबरीत जैनधर्मिय कुटुंब चित्रीत करण्यात त्यांना यश आले आहे.

### पुरूष प्रधान संस्कृती

फार पूर्वीपासून भारतीय समाजात पुरूषप्रधान संस्कृती चालत आलेली आहे. पुरूषांनी स्वत:ला श्रेष्ठ समजून स्त्रीला दुय्यम स्थान दिले आहे. मी कमवतो, मी नवरा आहे, बायकोने माझे सर्व ऐकले पाहिजे बायको गृहिणी असेल तर ही भावना पुरूषांच्यात मोठ्या प्रमाणात आढळते. कुटुंबात आपलाच हुकूम चालला पाहिजे. मला आवडते तेच बायकोने केले पाहिजे अशी पुरूषांची मानसिकता असते.

विमलाबाई हे व्यक्तिचित्रण पुरूषप्रधानसंस्कृतीत वावरणाऱ्या हळव्या, भावुक मनाच्या पारंपरिक भारतीय स्त्रीचे मूर्तिमंत उदाहरण आहे. कमलाकर कुटुंबप्रमुख असल्याने ते नेहमी आपले म्हणणेच खरे करताना दिसतात. घरातील प्रत्येकाने आपलेच म्हणणे ऐकले पाहिजे हा त्यांचा हट्ट असतो. विमलाबाई साध्या, सरळ, प्रामाणिक संवेदनशील मनाच्या आहेत पण

त्यांना त्याची किंमत नाही. त्यांना ते कसेही बोलतात, छोट्या छोट्या कारणासाठी ओरडतात, घाणेरड्या शिव्या देतात. हे सर्व त्यांनी सहन करावे अशी त्यांची इच्छा असते. त्यादेखील मुलांपेक्षा स्वत:पेक्षा कमलाकरांचाच विचार करतात. त्यांना हवं नको ते बघतात. एवढे करून त्यांना त्यांच्या शिव्या, ओरडणं, चिडणं सर्व काही सहन करावे लागते.

मुलं मोठी झाल्यावर 'तू आमच्यासाठी काय केलंस?' असा प्रश्न विचारतात. विमलाबाई त्यांना दोष देत नाहीत. मुलांनी कुठली गोष्ट विचारली की, बाबा काय म्हणतील? बाबा रागावतील! 'त्यांना विचारा! त्यांना सांगा!' असे उत्तर देतात. त्यांचा सर्व वेळ कमलाकरांची बडदास्त करण्यात जातो व मुलांकडे त्यांचे दुर्लक्ष होते. ''त्या मुलांना सांगू शकत नाहीत की आई असण्यापेक्षा मी एक बाई आहे. आणि हे बाईपण आईपेक्षा लाचार आहे!''[५]

कमलाकर त्या जेवायला बसल्यावर त्यांना गू खा, शेण खा असे घाण बोलतात. त्या ताट टाकू पाहतात तर ते त्यांना टाकू देत नाहीत ओरडून त्यांना खायला लावतात. रडायला लागल्या तर रडूही देत नाहीत. ते आपल्या बायकोच्या मनाचा, इच्छेचा, भावनांचा जराही विचार करीत नाहीत. कधी कधी विमलाबाईंना इतका राग येतो की त्यांना त्यांच्या थोबाडीत द्यावीशी वाटते पण त्या तसे करू शकत नाहीत. विमलाबाईंनी निमूटपणे सहन केल्याने त्यांची अशी अवस्था झालेली आहे.

एकदा कमलाकरांनी विमलाबाईना भर पावसात घराबाहेर काढले. त्या पावसात भिजत, थंडीत कुडकुडत उभ्या राहिल्या. कमलाकरांनी दार उघडून कुत्र्याला आत घेतले पण त्यांना आत घेतले नाही. पुरूषप्रधान संस्कृतीचे कमलाकर हे उत्तम उदाहरण आहे. ते स्वत:च्या मनाला वाटेल तसे वागताना दिसतात. वर्चस्व गाजवताना दिसतात. त्यांच्या त्रासाला कंटाळून विमलाबाई दूर राहण्याचा निर्णय घेतात तेंव्हा ते खूप चिडतात. त्यांनी मागितलेला दागिन्यांचा डबा, शेगडी इत्यादी काहीही घेवू देत नाहीत. उलट अंगावरील सर्व दागिने काढायला सांगतात. नवऱ्याची शेवटपर्यंत साथ करायची असते असे ठासून सांगतात.

पण त्या ऐकत नाहीत. आऊटहाउसमध्ये स्वतंत्र राहतात. कमलाकरांना आनंद त्यांना पाहवत नाही.

त्यांचे कुष्ठरोगी वसाहतीत जाणे त्यांना आवडत नाही. तेंव्हा सुरेशही आईला तिकडे न जाण्याविषयी सांगतो पण त्या ऐकत नाहीत. हे पाहून तोही चिडतो, त्याचा पुरूषी अहंकार जागा होतो. आईवर एवढी माया असणारा सुरेश या कारणाने आईशी अद्वातद्वा बोलतो. कोणत्याही स्त्रीने आपल्या मर्जीनुसार न वागता कधी नवरा तर कधी मुलगा यांच्या अधिकाराखाली वागावे असे समाजाला वाटत असते. पण या पुरूषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रीची ससेहोलपट होताना दिसते. विमलाबाई व संध्या दोघीही गृहीणी आहेत. संध्यालाही सुरेश व कमलाकरांच्या वर्चस्वाखाली वागावे लागते. त्या दोघांच्या पुढे कधीकधी तिचे काहीही चालत नाही. इच्छा असूनही तिला काहीही बोलता येत नाही. पुरूषप्रधान संस्कृतीतील सुरेश, कमलाकर हे दोन्ही पुरूष संध्या व विमलाबाई यांच्यावर वर्चस्व गाजवताना दिसतात.

### स्त्रीवादी लेखन

नीलम माणगावे यांचे लेखन स्त्रीवादी दृष्टिकोनातून झालेले आहे. त्यांच्या लेखनात स्त्रीला माणूस म्हणून स्थान असावे असे त्यांचे मत कादंबरीत मांडताना दिसतात. 'मृत्युदंड' या कादंबरीतून स्त्रीवादी लेखन झाल्याचे दिसून येते." स्त्रियांचे दुय्यमत्व आणि त्यासाठील कराव्या लागणाऱ्या संघर्षाचे विश्लेषण म्हणजे स्त्रीवाद."[६] असे मत गुंफा कोकाटे यांनी व्यक्त केलेले दिसते. जैन समाजातील लोक कांदा व लसूण खात नाहीत. पण आजकाल काहीजण हे पाळत नाहीत. यावरून बदलत्या काळानुसार बदलणाऱ्या समाजमनाची कल्पना येते.

जैन समाजातील लोक कांदा व लसूण खात नाहीत. पण आजकाल काहीजण हे पाळत नाहीत. यावरून बदलत्या काळानुसार बदलणाऱ्या समाजमनाची कल्पना येते.

जैन समाजातील लोक कांदा व लसूण खात नाहीत. पण आजकाल काहीजण हे पाळत नाहीत. यावरून बदलत्या काळानुसार बदलणाऱ्या समाजमनाची कल्पना येते.

विमलाबाई स्वतःच्या मनाप्रमाणे, इच्छेप्रमाणे न वागता त्या कमलाकरांच्या मतानुसार वागतात. चाळीस वर्ष संसार केल्यानंतर त्यांना स्वतंत्र रहावेसे वाटते. त्यांना स्वतःच्या



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

अस्तित्वाची जाणीव होते. आपल्याला शिक्षण नाही, नोकरी नाही याची खंत त्यांना वाटते. जी स्त्री स्वावलंबी नसते, तिला नवऱ्याच्या दावणीला रहावे लागते हे माहीत असूनही त्या स्वतंत्र राहतात. पण याला कमलाकर कडाडून विरोध करतात, तेंव्हा त्या त्यांना सुनावतात "तुम्ही माझी कधी कदर केली नाही? कधी मला समजून घेतलंत? कधी माझा विचार केलात? कधी माझं मन जाणलंत? अहो, मी तुमची पत्नी आहे! गृहलक्ष्मी आहे! सखी आहे! सोबती आहे! तुम्ही माझे काय आहात? आदर्श पती? सखा? सोबती? की मालक? तुमची भूमिका कुठली? कधी मला बरोबरीची मानलीत? घालून पाडून बोलण्याशिवाय आणि साध्या साध्या गोष्टीला खेकसण्याशिवाय तुम्ही काय केलंत? स्त्री ही क्षणकालाची पत्नी असून अनंतकालाची माता असते...... अनंत कालाची माता म्हणून तिच्याकडून सेवा करून घेताना.... आपले लाड पुरवून घेताना स्त्रीलासुद्धा पती हा अनंत काळाचा राहू दे पण क्षणकाळासाठी तरी पिता व्हावा... तिला आपल्या पित्याचा, भावाचा, चुलत्याचा ओलावा मिळावा असे वाटत नसेल? कधी या दृष्टीने तुम्ही विचार केलात?"[७] (२०-२१) त्यांच्या या प्रश्नांतून त्यांना स्वतःच्या अस्तित्वाविषयी जागृत झालेले आत्मभान दिसून येते.

नवऱ्याला सोडून बायकोने असे वेगळे राहणे समाजव्यवस्थेच्या विरूद्ध असल्याने त्याचा त्रास त्या स्त्रीला होतच असतो. नवऱ्याने बायकोचा कितीही छळ केला तरी तिने त्याच्यासोबत रहावे, जीवन कंठावे अशी समाजाची भावना असते. अजय, विजय तसेच धनंजय हे देखील विमलाबाईंना घरात परत जायला सांगतात. तेंव्हा त्या विचार करतात. "अर्धाधिक संसार केलेली बाई नवरा सोडून आनंदात राहते ही गोष्ट तुम्हाला नाऊमेद करणारी आहे. पण अशा गोष्टी तुम्हाला पचवाव्या लागतील. किंवा तुम्हाला बदलायला भाग पाडतील."[८] (४८) अजय, विजय त्यांना आऊटहाऊसमध्ये न राहता आपल्याकडे किंवा तीर्थक्षेत्री राहण्याचे सुचवितात. तेंव्हा त्या मनातल्या मनात म्हणतात, "अरे काय करायचं? कसं रहायचं? कुठं रहायचं? हे मला ठरवू द्या ना! जीवन माझं आहे, ते कसं जगायचं हे ठरवण्याचा मला अधिकार आहे की नाही?"[९]

आपल्याला ज्या घरात माणूस म्हणून स्थान नाही, कमलाकरांना आपण नको आहोत, तर अशा घरात अपमान सहन करत जगण्यापेक्षा आपण वेगळं राहिलेलंच चांगल असा विचार करून त्या वेगळ्या राहतात. विभावरी शिरूरकरांच्या 'शबरी' कादंबरीतील शबरीची मनोवस्था देखील अशीच झालेली आहे. म्हणून ती देखील अभिरामपासून वेगळे राहण्याचे निर्णय घेताना दिसते.

एकदा संध्या आपल्या सासऱ्याला उलट बोलते तेंव्हा विमलाबाई बाईमाणसानं आपल्या पायरीनं रहावं असा विचार करतात. पण लगेच स्वत:ला सावरतात व स्वत:ला दोष देतात. बाईची व पुरूषाची पायरी वेगळी न असता एकाच पायरीवर दोघेही उभे हवेत असा विचार करतात.

मैनासुंदरीच्या आख्यानात मैनासुंदरी आपल्या कुष्ठरोगी पतीची सेवा करते हे ऐकून जर मैनासुंदरीला कुष्ठरोग झाला असता, तर तिच्या नवऱ्याने तिची सेवा केली असती का? असा प्रश्न त्या उपस्थित करून वाचकांना विचार करायला लावतात. विमलाबाईंच्या माध्यमातून नीलम माणगावे यांनी आपले स्त्रीवादी विचार मांडलेले दिसून येतात.

**समाजाकडून स्त्रीला दिली जाणारी वागणूक**

पुरूषप्रधान संस्कृती असणारा भारतीय समाज स्त्रीकडे दुय्यम, उपेक्षित घटक म्हणून पाहताना दिसतो. स्त्रीने नवऱ्याला, मुलांना सांभाळावे अशी त्यांची इच्छा असते. नवऱ्याने कमवून आणावे व स्त्रीने जेवण करून सर्वांना घालावे अशी रीत दिसते. रांधा, वाढा, उष्टी काढा यातच तिचे संपूर्ण आयुष्य जाते. आयुष्यभर केलेल्या या कष्टाचे चीजही होत नाही. घरकामाला महत्त्व दिले जात नाही. गृहिणीने घर सांभाळले म्हणून तिला कोणी मानधन देत नाही. तरीही ती आपली आवड, इच्छा बाजूला ठेवून नवरा, मुलं यांचा जास्त विचार करते. चूल आणि मुल तिचे विश्व होते. आज बहुतेक स्त्रिया नोकरी, व्यवसाय करत असताना दिसत असल्या तरी त्यांची स्थिती फारशी वेगळी नाही. सुरूवातीला घर सांभाळणे एवढीच तिची जबाबदारी होती. परंतु आता घराबरोबरच नोकरी व्यावसायाचीसुद्धा जबाबदारी तिला पार पाडावी लागत आहे असे दिसते.

'मृत्युदंड' कादंबरीतील नायिका विमलाबाई या भारतीय स्त्रीचे मूर्तिमंत उदाहरण आहेत. संध्या व त्या दोघीही गृहिणी आहेत. कमलाकरांच्या स्वभावाला कंटाळून स्वतंत्र आयुष्य जगताना त्यांना आनंद, मानसिक स्वास्थ्य मिळते. पण समाजातील लोक मात्र सत्य परिस्थिती काय आहे हे समजून, जाणून न घेता नवऱ्याने घरातून हाकलले असेल, सुनेबरोबर पटत नसेल इ. तर्क करून या विषयी प्रतिक्रिया व्यक्त करतात.

स्त्रीला मासिक पाळी येणे हे अगदी नैसर्गिक आहे. पण याला तिने कोणाला शिवायचे नाही, देवळात जायचे नाही अशा धार्मिक गोष्टी जोडल्याने स्त्रियांचे हाल होताना दिसतात. घरात एखादे धार्मिक कार्य असेल तर स्त्रिया गोळ्या खाऊन मासिक पाळी पुढे ढकलतात, पण अशा गोळ्या खाल्याने त्यांच्या गर्भाशयाला इजा पोहचण्याची शक्यता असते. मासिक पाळी असताना स्त्री जर धार्मिक विधी करत असेल तर समाजात पाप समजले जाते. 'मृत्युदंड' कादंबरीतील डॉ. उत्तम ही व्यक्तीरेखा मात्र शिवाशीव पाळण्यास पुर्ण नकार देते. शिक्षित झाल्याने त्यांच्याकडे वैज्ञानिक दृष्टिकोन येऊन काही स्त्रिया डॉ. उत्तम सारखा विचार करताना दिसतात. पण समाज त्यांच्याकडे कुत्सित नजरेने पाहताना दिसतो

लग्नामध्ये सुनांनी माहेरहून हुंडा आणावा, मोठ्या वस्तू आणाव्या अशी अपेक्षा केली जाते. तिने काय काय आणले हे सर्वांना दाखवले जाते. यामुळे उपवर मुलीला काय आणायचे असते याचे प्रशिक्षण मिळते. तसेच ज्या सुनांनी काही आणले नाही त्यांचा सासवा छळ करतात. यामुळे हुंडाबळी सारखे घातक प्रकार घडतात. आजकाल याचे प्रमाण कमी झाले असले तरी पुर्णपणे संपलेले नाही. याबद्दल लेखिका नीलम माणगावे आपल्या निवेदनात लिहितात "एखाद्या तालेवाराच्या मुलीनं सोन-नाण, चांदीची भांडी वगैरे आणलेली असेल तर त्या मुलीला कुठं ठेवू अन् कुठं नको असं सासरच्यांना होऊन जातं आणि विशेष काही न आणलेल्या सुनेला छळायचं एक जबरदस्त कारण मिळून जातं."[१०]

तसेच सासरी नांदणाऱ्या सुनेकडून काही चुकले तर तिच्या माहेरकडून आई-वडिल, भाऊ आदींच्याकडून तिला समज द्यायला सांगितले जाते. विमलाबाईंच्या लग्नाला ४० वर्षे झाली तरी कमलाकर त्यांनी कुष्ठरोग्यांच्या वसाहतीत जाऊ नये हे त्यांना समजून सांगण्यासाठी

धनंजय यांना बोलावून घेताना दिसतात. समाजात या गोष्टी सर्रास घडताना दिसतात. पुरूषापेक्षा स्त्रीला अधिक बंधने व मर्यादा घालून दिलेल्या आहेत. परंपरेला एखादी स्त्री वागली तर समाज तिला नावे ठेवताना दिसतो. स्त्रीने नवऱ्याच्या मर्जीनुसार वागावे. नवऱ्याने बायकोला मारले तर लोकांना त्यात काही विशेष वाटत नाही. पण बायकोने नवऱ्याला मारणे हे आक्रीत समजले जाते.

## कुष्ठरोग्यांचे जीवनचित्रण

विमलाबाईंनी कुष्ठरोग्यांच्या वसाहतीत जाऊन कार्य करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी त्या वसाहतीत गेल्या तेंव्हा त्यांनी पाहिले की, कुष्ठरोग्यांचे जीवन आपल्यापेक्षा खूपच वेगळे आहे. कुष्ठरोग्यांना घरे नाहीत. झोपड्या आहेत. त्यातही झोपड्या जास्त व माणसे कमी आहेत. कुष्ठरोगी वसाहतीचे वर्णन करताना लेखिका लिहितात, ''ठराविक आकाराच्या एकसारख्या दिसणाऱ्या झोपड्या, झोपड्यावर वाळायला टाकलेली चिरगुटं, गुंडाळून ठेवलेली अंथरूण, दारातली चूल, चुलीसमोरील राख, चार दोन अॅल्युमिनीअमची भांडी, उघडी नागडी असणारी आठ दहा पोरं, फाटक्या कापडातली एक म्हातारी तर झोपडी समोरच्या पोत्यावर आडवी झालेली अधल्या मधल्या जागेत असलेली घाण, मधून जाणारी गटारं, कागदाचे उडून आलेले बोळे, दुरून दिसणारे हे दृश्य अंगावर शहारे आणीत होतं.''[११] (११०) अशा बकाल वस्तीत कुष्ठरोगी आपले जीवन व्यतीत करतात. हे असे गलिच्छ वस्तीचे जीवन पाहून विमलाबाईंना यापेक्षा आपली भांडीवाली, गडी-माणसं सुखात राहतात असे वाटते. त्यांना कुष्ठरोग्यांची वस्ती पृथ्वीवरचा नरक वाटतो. अशा नरकात कुष्ठरोगी कसे राहत असतील असा त्यांना विचार पडतो. आपण या नरकात का आलो असेही त्यांना क्षणभर वाटून जाते.

कुष्ठरोग्यांच्या वसाहतीत शक्यतो पांढरपेशी माणसं फिरकत नाहीत. पण निवडणुकीच्यावेळी कार्यकर्ते, पुढारी त्यांच्याबरोबर माणसांची झुंड, फोटोग्राफर येतात आणि निघून जातात. पण त्यांचे प्रश्न कोणीही सोडवत नाही. म्हणूनच पांढरपेशा लोकांवर त्यांचा विश्वास नाही. या वसाहतीतील सर्वजण एकोप्याने राहतात. ती समदु:खी असल्याने वर्षानुवर्षे

एकत्रित राहल्याने त्यांच्यात आपलेपणाची भावनाआहे. एका मोठ्या कुटुंबातील व्यक्तींप्रमाणे ते सर्व एकत्र नांदतात. त्यांच्या त्यांच्यात भांडणे, मारामारी, शिव्या देणे, बायकांनी एकमेकींच्या झिंज्या उपटणे, पुरूषांनी दारू पिवून बायकांना मारणे असे प्रकार होत असतात पण जेव्हा परकीय व्यक्ती त्याच्यापैकी कोणाबरोबर भांडायला आली तर ती सर्व एकत्र होवून त्याच्यावर तुटून पडतात. याविषयी लेखिका माणगावे लिहीतात, आपापसात भांडताना ते कौरव पांडवासारखे शंभर आणि पाच असले तरी बाहेरच्याशी सामना असेल तर पुरे एकशे पाच व्हायचे.''[१२]

कुष्ठरोगी वसाहत गावकुसाबाहेर निर्माण झाली. देवळासमोर, स्टँडसमोर, बाजारात ओळीने भीक मागण्यासाठी रोज शेजारी बसता-बसता गावकुसाबाहेर एकत्र राहू लागलात आणि शारिरीक भूक भागविताना लग्न, मुलं, संसार वाढला. त्यांची एक वेगळी जमातच तयार होते. ज्या जागेत ते राहत त्या जागेच्या मालकाने तिथून हाकलून दिले तर त्यांना दुसऱ्या ठिकाणी जावे लागते. तिथूनही हाकलले तर दुसरीकडे जाण्यासाठी त्यांना तयार रहावे लागते. या वसाहतीतील तळीरामने सर्वांना घरकामे मिळावी म्हणून सरकार दरबारी हेलपाटे घातले. मुख्यमंत्र्यापर्यंत जावून आला. नगरपालिकेसमोर धरणे धरले पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. या वसाहतीमध्ये हायवेवर असणाऱ्या हॉटेलमधून सांडपाणी व सार्वजनिक मुतारीतील घाण उघड्या गटाराद्वारे वाहत जाते त्याची दुर्गंधी सर्वत्र पसरते. कुष्ठरोगी तेथेच जेवतात. संसार करतात, मुले तिथेच खेळतात, पडलेला खाऊ उचलून खातात. तसेच येथे वीज, पाणी यांची सोय नाही. तरीही ते जीवन जगतात. कुष्ठरोग्यांची जमात गावकुसाबाहेर राहणारी, हातावरचे पोट असणारी, वेदना, अपमान, दुःख, हालअपेष्टा यांचा मारा सहन करताना दिसते. शिक्षण ज्ञान, संस्कार यांचा अभाव दिसतो. पाचवीला पुजलेले दारिद्र्य आणि अज्ञान यामुळे त्यांना आयुष्यभर कष्ट करावे लागते. कुष्ठरोग झाल्याने त्यांना घरात, समाजात कसलेच स्थान मिळत नाही. अशा वेळेस त्याच्याकडे भीक मागण्याशिवाय पर्याय राहत नाही. ही माणसे देव मानत नाहीत, जात मानत नाहीत.

कुष्ठरोग्यांना घर, शिक्षण, नागरीकत्व नाही. त्यांच्या मुलांना कोण जवळ करत नाही. कुष्ठरोग झाला असल्याने त्यांना कोणी काम देतं नाही. काम मिळाले तरी त्यांच्याबरोबर काम करणारे कामगार त्यांना आपल्यात सामावून न घेता स्वत:च त्याला काढून टाकण्यासाठी प्रयत्न करतात. रोगराई, अपमान, अवहेलना, अस्वच्छता इत्यादींना सामोरे जात त्यांना आयुष्य कंठावे लागते. मृत्युदंड कादंबरी माणगावे यांना कुष्ठरोग्यांचे जीवनचित्रीत करण्यात यश आले आहे.

**कुष्ठरोग्यांच्या संततीचा प्रश्न**

कुष्ठरोग्यांची मुलं ही सर्वसामान्य पांढरपेशी मुलांप्रमाणे दिसतात. शेंबडी, नकटी, काळी, गोरी, तरतरीत, देखणी सर्व प्रकारची मुलं त्या वसाहतीत आहेत. या नरकात त्यांना चांगले अन्न, निवारा मिळत नाही. विमलाबाई या मुलांना शाळेला जाता का? असा प्रश्न विचारल्यावर शाळा म्हणजे काय? दाखवायला आणाल काय? असा प्रश्न मुलं विचारतात. या मुलांना शाळेत जावून शिकायचे असते याविषयी काहीही माहीत नाही.

सर्वसामान्य पांढरपेशा घरातील मुलंही काका काकी, मामा-मामी, आजी-आजोबा इत्यादी गोतावळ्यात वाढतात पण कुष्ठरोग्यांच्या मुलांना कोणी नातलग नाही. त्यांना कोणी नातलग भेटण्यास येत नाही. प्रेमाने खेळणी, खाऊ आणून देत नाहीत. माणगावे लिहीतात ''दगड धोंडे, कचऱ्यात सापडलेली मोडकी खेळणी हे त्यांचे खेळाचे साहित्य! भीक मागून आणलेलं शिळं-पाक आमलेल जेवण हे त्यांच जेवण! ना पै, ना पाहुणे, ना नातलग, ना गाव, ना आजोळ जे आहे ते हेच! कुणाला आई नाही, कुणाला वडील नाही, आजी-आजोबांचा पत्ता नाही! ...रक्ताची मुलं सोडून कुणी कुणाचं नव्हतं.''[१३]

कुष्ठरोगी लोकांची जन्ममृत्यूची नोंद होत नाही. मुलांना जन्मतारखेचा दाखला मिळत नाही. त्यांना बापाचे नाव नसते. घराचा ठाव ठिकाणा नसतो. मुलांच्या आईवडीलांच्या लग्नाला कायद्याची मान्यता नसल्याने कायदेशीर विवाह होत नाही. त्यामुळे मुलांना नागरीकत्व मिळत नाही. कुष्ठरोगी वसाहतीतील लोकांना आपली मुलं शिकावीत, नोकरी

करून मोठी व्हावीत, आपल्यासारखे त्यांचे आयुष्य जावू नये असे त्यांना मनापासून वाटते. पण या मुलांना शाळेत प्रवेश मिळत नाही. यामुळे ती शिक्षणापासून वंचित राहताना दिसतात.

सर्वसामान्य मुलांच्यासारखीच ही मुले हसतात, खेळतात. खेळताना भांडतात, पुन्हा एकत्र येतात. दिसायला सर्वसामान्य मुलांसारखीच असणाऱ्या मुलांचे प्रश्न मात्र त्यांच्यापेक्षा पूर्णपणे वेगळे असलेले दिसतात. मृत्युदंड कादंबरीत कुष्ठरोग्यांचे जीवनचित्रण करताना नीलम माणगावे यांनी त्यांच्या संततीचे प्रश्नही मांडलेले दिसतात.

**स्त्री शोषिकता**

लहानपणापासून केलेल्या संस्कारामुळे स्त्रिया नवऱ्याचा, समाजाचा छळ सहन करतात. मृत्युदंड कादंबरीतील विमलाबाई या स्त्री शोषिकतेच्या प्रतिनिधी वाटतात. चाळीस वर्षे त्या कमलाकरांच्याबरोबर संसार करतात. प्रेम न करणाऱ्या, पदोपदी अपमान करणाऱ्या, घराबाहेर काढणाऱ्या नवऱ्याबरोबर त्या चाळीस वर्षे संसार करतात, सर्व काही सोसत जगतात. स्वत:चे मन मारून जगतात. त्यांचे काही चुकले तर कमलाकर दहा मिनिटांपासून दोन तासांपर्यंत बडबड करत राहतात. शेण खा, गू खा म्हणतात. समोर बसून आपलं सर्व ऐकून घ्यायला लावतात.छोट्या छोट्या कारणावरून त्याच्यांशी भांडतात. त्या मात्र हे निमूटपणे सहन करताना दिसतात.

कमलाकरांच्या रागावण्याबद्दल, चिडण्याबद्दल त्या कधीही तक्रार करीत नाहीत. माणूस आहे राग येणारच अशी स्वत:ची समजूत घालताना दिसतात. कमलाकरांच्या या स्वभावाचा त्यांना इतका मानसिक त्रास होतो की त्या आत्महत्या करण्याचा विचार करायला लागतात. त्यांना होणारा त्रास त्या डॉक्टरकडे व्यक्त करताना म्हणतात, ‘‘रांड, उंडगीपासून ते..तुझ्या.. ते.. वगैरे! फार फार राग येतो रे मला! संताप येतो. अंगाचा भडका उडतो माझ्या, अंगाची लाही लाही होते. वाटत उठून दोन थोबाडीत ठेवून द्याव्यात! पण नाही! काही करत नाही मी! साधा वाद घालत नाही की उलट बोलत नाही. रडते! फक्त रडते मी! मूक अश्रू गाळीत!’’[१४] यातून त्यांनी किती सहन केले असेल हे दिसते.

डॉ. उत्तम जेव्हा शिवाशीव चालणार नाही म्हणून भांडून माहेरी जाते तेव्हा विमलाबाई तिलाच तडजोड करायला सांगताना दिसतात. सुरेश व कमलाकर यांच्या वागण्याला कंटाळून संध्या त्यांना धडा शिकवायचे ठरवते. तेव्हा मुलं लहान आहेत त्यांच्या पंखात बळ येईपर्यंत तुला सहन करायला हवं. नाहीतर मुलांना त्रास होईल. ती आईविना पोरकी होतील. अशी समजूत घालून विमलाबाई संध्याला सहन करायला सांगतात. विमलाबाई कमलाकरांनी केलेला छळ चाळीस वर्षे सहन करतात. त्यानंतर त्या स्वतंत्रपणे राहण्याचे धाडस करतात. पण स्वतंत्र राहिल्यानंतर सुध्दा कमलाकर त्यांना कुठून तरी त्रास देण्याचा प्रयत्न करतात. त्यांना कुष्ठरोग झाल्याची आवई उठवतात. पण त्यांच्या या वागण्याबद्दल त्यांना जाब विचारत नाहीत. भांडत नाहीत. ते सर्व सोसताना दिसतात.

विमलाबाई चाळीस वर्षे संसार करूनही त्यांच्या पदरात काहीच पडताना दिसत नाही. स्त्रिया आपल्या संसारासाठी आपल्या आयुष्याचा संपूर्ण वेळ देतात, आपलं आयुष्य घालवतात. आपलं मन व शरीर सारं काही त्यांनी संसारासाठी वाहिलेलं असत. असं असूनही त्यांना घरात दिलं जाणारं स्थान हे दुय्यम असतं. प्रत्येक ठिकाणी तिचं शोषण होताना दिसते.

**स्त्रीची मानसिकता**

फार पूर्वीपासून भारतीय समाजात वावरणारी स्त्री नवऱ्याला सांभाळणे, मुलांना जन्म देणे, त्यांचा सांभाळ करणे एवढेच तिचे कार्यक्षेत्र होते. नवऱ्याने केलेला छळ, मारहाण, दिलेल्या शिव्या, अत्याचार सहन करत त्याच्याशी एकनिष्ठ राहून संसार करणाऱ्या स्त्रियांना भारतीय स्त्री म्हणून भूषविले जाते. विमलाबाई या भारतीय स्त्रीचे मुर्तीमंत उदाहरण दिसतात. त्या आपल्या नवऱ्याचा छळ तब्बल चाळीस वर्षे सहन करतात नंतर स्वतंत्र राहतात. तरीही त्यांची आपल्या नवऱ्यावरची निष्ठा ढळत नाही असे दिसते.

द्रौपदी, सावित्री, मैनासुंदरी यांची पतीनिष्ठा, त्यांनी आपल्या पतींना परमेश्वर समजून त्यांची केलेली सेवा यांचे संस्कार बालपणापासून मुलींवर होत असतात. त्यामुळे मुलींची मानसिकता तशीच घडताना दिसते. पण आज स्त्रिया स्वतंत्रपणे विचार करताना दिसतात.

आजच्या युगात त्या आपल्या नवऱ्याचा छळ सहन करत नाहीत. मनाला न पटणाऱ्या गोष्टींना त्या स्पष्टपणे नकार देताना दिसतात. डॉ. उत्तम हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. शिवाशीव करणे तिच्या मनाला पटत नसल्याने जे मला पटत नाही ते मी करणार नाही असे ठामपणे सांगते. याविषयावरून सासू व नवरा यांच्याशी वाद घालताना दिसते.

घरकाम करून आपल्या नवऱ्याला व मुलांना सांभाळणाऱ्या स्त्रियासुध्दा भारतीय समाजात दिसतात. दारू पिवून मारहाण करणाऱ्या नवऱ्याला त्या सोडत नाहीत. समाजाचा नातेवाईक, आई-वडील, समाज यांचा विचार करताना दिसतात. विमलाबाईंची भांडीवाली त्यांना म्हणते, ''कितीक बायकांचे नवरे रागावतात, शिव्या देतात, मारतात पण त्या बायका घोरपडीवाणी नवऱ्याला चिकटून राहतात.. मी काम करते. पैसे मिळवते, पोराला शिकवते आणि तो.... नुसता दारू पिवून धिंगाणा घालतो. तरीसुध्दा मी तिथंच राहते. धाडसं होत नाही त्याला सोडायचं. वाटतयं लोक काय म्हणतील पण आजी तुम्ही चांगल केलं बघा. ज्या नवऱ्याला आपली किंमत नाही त्या नवऱ्याजवळ राहायचं कशाला?''[१५] म्हणजे भांडीवालीला दारू पिवून मारणाऱ्या बेजबाबदार नवऱ्यापासून वेगळं राहायचं आहे पण तिचे धाडस होत नाही. स्त्रियांची मानसिकता हळूहळू बदलताना दिसते. पती परमेश्वर ही संकल्पना बाजूला जावून स्त्रियांनासुध्दा अस्तित्व आहे ही जाणीव त्यांना होवू लागली आहे असे दिसते.

### जुनी पिढी-नवी पिढी संघर्ष

कोणत्याही काळात जुनी पिढी व नवी पिढी यांच्या आचार विचारात फरक हा असतोच त्यामुळे त्यांच्यात संघर्ष होताना दिसतो. दोन्ही पिढ्यांनी एकमेकांना समजून घेतल्यास तो टाळता येवू शकतो. व्यक्तीविकास व सामाजिक विकासाच्यादृष्टीने तसा संघर्ष होणे आवश्यकही असते. पण तो विकोपाला जाऊन त्याचे दुष्परिणाम उद्‌भवू नयेत म्हणून जुनं ते सोनं आणि नवं ते हवं या विचारांनी दोघांनीही सुवर्णमध्य साधणे गरजेचे असते.

'मृत्युदंड' या कांदबरीत विमलाबाई, सुवर्णा, सुमन या जुन्या पिढीच्या आहेत, तर संध्या, रेखा, डॉ. उत्तम या नव्या पिढीतील आहेत. विमलाताई व संध्या दोन्हीही समंजस

वृत्तीच्या असल्याने एकमेकींना समजून घेताना दिसतात, त्यामुळे त्यांच्यात संघर्ष होत नाहीत. पण सुवर्णा पारंपरिक वृत्तीची असल्याने ती आपली विचार सोडून डॉ. उत्तमचे आधुनिक, वैज्ञानिक विचार मान्य करायला तयार नाही. त्यामुळे त्यांच्यात संघर्ष होताना दिसतो. तो इतका विकोपाला जातो की, डॉ. उत्तमचा संसार उद्ध्वस्त व्हायची वेळ येते. डॉ. उत्तम एक डॉक्टर असल्याने मासिक पाळीच्या दिवशी बाजूला बसणे, शिवाशीव पाळणे या गोष्टी तिला मान्य नाहीत. तिच्या मनाला पटत नाहीत. पण सुवर्णा जुन्या विचारांना सोडायला तयार नाही. त्यांच्यावर बालपणापासून जे संस्कार झाले, ते सोडणे त्यांना जमत नाही. अशावेळेस सुवर्णा व उत्तमचा खूप वाद होतो. अशाप्रकारचे जुने विचार व नवे विचार असणाऱ्या व्यक्तींमध्ये नेहमीच संघर्ष होताना दिसतो.

**वाङ्मयीन वैशिष्ट्ये**

कादंबरीचा अभ्यास करीत असताना कादंबरीतील समाजजीवन व त्याबरोबरच कादंबरीची वाङ्मयीन वैशिष्ट्ये यांचा अभ्यास होणे गरजेचे असते.

**कथानक**

''गुंतागुंत, निरगाठ आणि उकल अशी तीन स्थाने कादंबरीत असावयास पाहिजेत.''[१६] असे फडक्यांचे म्हणणे आहे. पण हे तंत्र लेखिकेने वापरलेले दिसत नाही. साठ वर्षांच्या विमलाबाई कमलाकरांबरोबर ४० वर्षे संसार करतात. त्यांना अजय, विजय, सुरेश अशी तीन मुलं होतात. कमलाकरांनी त्यांना कधी प्रेम, माया दिली नाही. छोट्या छोट्या गोष्टीसाठी ओरडणे, शिव्या देणे, कधी कधी मारणे असे प्रकार केले. पण त्या ते निमूटपणे सहन करतात. मुलाकडेसुद्धा त्यांना पूर्ण लक्ष देता येत नाही. कारण त्यांचा सर्व वेळ कमलाकरांची बडदास्त ठेवण्यात जाई. त्या नेहमीच धास्तावलेल्या, भेदरलेल्या मनस्थितीत असतात. पण लग्नाच्या ४० वर्षानंतर स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतात. याला कमलाकर कडाडून विरोध करतात. सुरेश आपल्या आईची बाजू घेऊन त्यांना आऊटहाऊसमध्ये राहण्यास मदत करतो.

विमलाबाई आऊटहाऊसमध्ये राहू लागतात, स्वातंत्र्याचा आनंद उपभोगू लागतात. देव धर्म, जपजाप्य, पुजाअर्चा अशा धार्मिक कार्यात वेळ घालवतात. मैनासुंदरीच्या आख्यानात गढून जातात. संध्या-सुरेश, शैलेश व दिपा त्यांच्याकडे जात असतात. पण कमलाकरांना हे पाहवत नाही. कोणत्याना कोणत्या प्रकारे त्यांना त्रास देण्याचा ते प्रयत्न करतात. त्यांना कुष्ठरोग झालेला आहे अशी आवई उठवतात. त्यामुळे विमलाबाईंशी कोणी बोलत, शिवत नाहीत. त्यांना अस्पृश्यांसारखी वागणूक देतात. कमलाकर आपली नातवंडे शैलेश, दिपा यांना आजीला महारोग झाल्याचे सांगतात. त्यामुळे त्यांची नातवंडं त्यांच्याकडे साशंक नजरेने पाहतात, तेंव्हा त्यांना आपण मरून जावे असे वाटते. आपल्या जगण्याला काही अर्थ नाही. कोणासाठी जगायचे असा विचार त्या करू लागतात. स्वत:ला घरात कोंडून घेतात.

एक दिवस त्या फिरायला म्हणून बाहेर पडतात, तेंव्हा त्यांच्या मनात आत्महत्येचा विचार उफाळून बाहेर येतो. व त्या एका भरधाव धावणाऱ्या ट्रकसमोर येतात, पण वाचतात. त्याचवेळेस तेथे एका कुष्ठरोगी म्हातारीची जगण्याची उमेद पाहून तिला ही जगण्याची कला कोणी शिकवली? असा विचार करतात. तेंव्हा त्यांना बाबा आमटे, म. गांधी यांनी केलेले कार्य आठवते. आपणही असेच कार्य का करू नये. असे त्यांच्या मनात येते. त्याच्या दुसऱ्या दिवशीच त्या कुष्ठरोगी वसाहतीत जातात. तेथील लोक त्यांच स्वागत करण्याऐवजी अपमान करतात. परत घरी जाण्याचा सल्ला देतात. तरीही त्यांच्या मुलांना त्या जीव लावतात. हळहळू सर्वांच्या मनात आपल्याविषयी विश्वास निर्माण करतात. त्यांना शिक्षण, भीक न मागता कष्टाने पोट भरण्याचा सल्ला देतात. महिला मंडळाची मदत घेऊन कुष्ठरोगी वसाहतीचा त्या कायापालट करतात. आपल्याला शक्य तेवढी मदत त्या करतात. सुरेशला आईचे कुष्ठरोगी वसाहतीत जाणे आवडलेले नसल्याने तोही आईला विरोध करतो. पण त्या कोणाचेही ऐकत नाहीत.

एकदा कमलाकर खूप आजारी पडतात. त्यांना विमलाबाईंचे तोंड पहायचे नसल्याने त्या त्यांच्याकडे जात नाहीत. कमलाकरांना झोप लागलेली आहे हे पाहून त्या त्यांच्या

खोलीत जातात. ते पाणी मागताहेत हे लक्षात आल्यानंतर पाणी देण्यासाठी वाटी हातात घेतात पण वाटी पडते. त्या आवाजाने कमलाकर उठतात व त्यांना खूप ओरडतात, कसेही बोलतात. त्या रडत आपल्या खोलीत जातात. तेंव्हादेखील त्यांच्या मनात आत्महत्येचे विचार येतात. त्यानंतर त्यांची तब्बेत हळूहळू ढासळते. डॉक्टर त्यांना दगदग करू नका असे सांगतात, तरी त्या दगदग करतात. स्वाध्याय, जप वगैरे करून त्या नेहमीसारख्या झोपलेल्या असताना त्यांना अस्वस्थ वाटून छातीत कळ येते. ती वाढत जाते. त्या णमोकार मंत्र म्हणत देवासमोर बसून राहतात. हार्टअटॅकने तिथेच त्यांची प्राणज्योत मालवते. त्या वारल्यानंतर कमलाकरांना खूप पश्चाताप होतो, पण त्यावेळेस विमलाबाई या जगात राहिलेल्या नसतात.

**व्यक्तिरेखा**

कोणत्याही साहित्याच्या मुळाशी माणूस हा घटक असतो. लेखकाला मानवी मनाच्या अंतरंगात शिरून दर्शन घ्यावे लागते. समाजात विविध स्वभावाच्या व्यक्ती वावरत असतात. लेखकाला मानवी स्वभाव वाचता आला पाहिजे व वाचकांपर्यंत कुशलतेने पोहचवता आला पाहिजे. साहित्यिक जेंव्हा कथानकाचा विचार करतो तेव्हा तो प्रथम त्यांच्या स्वभावाचा, भुमिकेचा विचार करतो. त्याला भेटलेल्या, मनाला भावलेल्या व्यक्तींचे तो सुक्ष्म निरीक्षण करून त्यांच्या स्वभावाचे बारकावे टिपतो. त्या व्यक्तिंचे विचार, स्वभाव यावर प्रकाश टाकतो.

**प्रमुख पात्रे**

**विमलाबाई**

विमलाबाई ही मृत्युदंड कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा आहे. साठ वर्षे वयाच्या गोऱ्या पान रंगाच्या विमलाबाई स्वभावाने शांत, विचारी, प्रेमळ, हळव्या आहेत. ब्लड प्रेशर, शुगर, सांधेदुखी, दमा, धाप इ. चा त्यांना त्रास नाही. त्यांच्या लग्नाला ४० वर्षे झाली आहेत. त्या सर्वांवर भरभरून प्रेम करताना दिसतात. कमलाकर यांच्यावरदेखील त्यांचा जीव आहे. पण त्यांच्याबरोबर संसार करताना त्यांना त्यांच्याकडून प्रेम, सुख, समाधान मिळालेले नाही. कमलाकरांचा स्वभाव तापट, विचित्र असल्याने विमलाबाईंना त्यांचा छळ सहन करावा

लागला आहे. तरीही शेवटपर्यंत त्या आपल्या नवऱ्यावर प्रेम करताना दिसतात. त्यांच्यावरची त्यांची निष्ठा ढळत नाही. त्यांची बडदास्त ठेवण्यात त्यांचा संपूर्ण वेळ जातो. त्यामुळे त्यांचे आपल्या मुलांकडे दुर्लक्ष होते.

कमलाकरांच्या आपमतलबी, तापट, विक्षिप्त स्वभावाचा त्यांना इतका त्रास होतो की त्या आत्महत्येचा विचार करतात. अशावेळेस त्या डॉक्टरांकडे जावून आपले मत व्यक्त करतात. त्याचां स्वभाव मनमोकळा नसल्याने त्या फार कोणाकडे बोलत नाहीत. आनंद दुसऱ्यांना वाटणे, दु:ख स्वत:सोसणे असा त्यांचा स्वभाव दिसतो. कमलाकर मानसशास्त्राचे प्राध्यापक असून आपल्याला समजून घेत नाही याचे त्यांना दु:ख आहे. गाडी, बंगला, दागदागिने सर्व असूनही त्या सुखी नाहीत. कारण त्यांना नवऱ्याचे प्रेम मिळत नाही. छोट्या छोट्या गोष्टींसाठी ते त्यांच्या शिव्या खातात. ओरडणे सहन करतात. क्वचित त्यांनी त्यांचा मारही खाल्ला आहे. त्या खूपच सहनशील वृत्तीच्या असल्याने सारे काही सहन करताना दिसतात.

एक दिवस भारतीय स्त्रीचा मुखवटा बाजूला सारून त्या कमलाकरांपासून वेगळं राहण्याचं ठरवितात. सुरेशच्या मध्यस्थीने आउटहाउसमध्ये रहायला जातात. जाताना ते आपले सर्व दागिने कमलाकरकडे ठेवून जातात. त्या स्वाभिमानी आहेत त्यामुळे त्या अंगावरच्या साडीवर जाण्यास तयार होतात. त्या धार्मिक वृत्तीच्या आहेत. स्वतंत्र राहिल्यानंतर आपला बराच वेळ देवधर्म, जप-जाप्य, स्वाध्याय, उपवास यात घालवतात. स्वातंत्र्य मिळाल्याने मनाप्रमाणे वागतात. अंबाड्यात फुल घालतात. महीन्याभरात त्यांच्या चेहऱ्यावर तजेला दिसायला लागतो. प्रवचनासाठी मंदीरात जातात. तेथील मैनासुंदरीचे आख्यान लक्षपूर्वक ऐकतात. त्याविषयी चिंतन करतात.

एरावती महीला मंडळाच्या अध्यक्ष सुमन देसाई व रेखा यांना विमलाबाईंचे कौतुक वाटते. त्यांच्याविषयी आदर वाटतो. त्या कौटुंबिक सल्ला घेण्यासाठी त्यांच्याकडे येताना दिसतात. विमलाबाईंच्या भांडीवालीला देखील त्यांचे वेगळे राहणे आवडले आहे. आमच्यात धाडस नाही तुमच्यात खूप धाडस आहे असे ती त्यांना बोलून दाखवते.

विमलाबाई जेव्हा जेव्हा अष्टक करतात तेव्हा तेव्हा प्रसादाची खडी साखर शैलेश दीपाला देतात. त्यांना वेगवेगळे पदार्थ करून खायला घालतात. तसेच त्यांच्याबरोबर मेंढीकोट, सापशिडी, चल्लस असे खेळ खेळतात. लहान होवून हसतात, खेळतात. त्या छोट्या छोट्या गोष्टीत आनंद मिळवण्याचा प्रयत्न करताना दिसतात. कमलाकर त्यांना कुष्ठरोग झाल्याची आवई उठवतात. तेंव्हा याचा त्यांना खूप मानसिक त्रास होतो. पण त्यातूनही त्या मार्ग काढतात. कुष्ठरोगी वसाहतीत जावून त्यांच्यासाठी कार्य करतात. कुष्ठरोग्यांना शिक्षण, स्वच्छता, दारू न पिणे, तिथल्या मुलांना शुध्द बोलण्यास शिकवणे इत्यादीची आपल्याला जमेल तेवढी मदत करतात. जेव्हा मुसळधार पाऊस पडतो तेव्हा कुष्ठरोग्यांच्या झोपड्या उध्वस्त झाल्या असतील या विचाराने अस्वस्थ होतात. णमोकार मंत्र जपतात. देवाजवळ त्यांच्यासाठी प्रार्थना करतात. दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून त्यांना भेट देण्यासाठी जातात. त्यांची वाताहत बघून हळहळतात. त्यांच्या चहा व जेवणाची सोय करून जातात. यातून त्यांची संवेदनशीलता व सेवाभावी वृत्ती दिसून येते. आयुष्याच्या अखेरीपर्यंत कुष्ठरोग्यांना शक्य तितकी मदत करतात. आपण जर कमवते असतो तर आणखी मदत करता आली असती. आपल्याला गाडी चालवता येत नाही, आपण कमवत नाही, आपल्याला मुलगी नाही याचे त्यांना दु:ख आहे. त्यांचे आपला भाऊ धनंजय यांच्यावर जीवापाड प्रेम आहे. त्यांचा मूळचा स्वभाव प्रेमळ असल्याने त्या प्रत्येकाशी आपुलकीने बोलताना दिसतात. सुरेशवर त्यांचा खूप जीव आहे. तो मोठा झाला तरी त्याला भरवतात व कृतकृत्य झाल्याचा आनंद घेतात.

कुष्ठरोग्यांजवळ त्या कमलाकरांचे गुणगान गातात. यामधून त्यांचा मनाचा मोठेपणा दिसतो. कमलाकर आजारी असताना ते त्यांचे तोंडही पाहणे पसंत करत नाहीत. यामुळे विमलाबाई मनाने कोसळून जातात. हळूहळू त्यांची तब्बेत ढासळू लागते. संध्या दु:खी, ब्लड प्रेशर हे आजार होतात. एक दिवस त्यांना हार्ट ॲटॅक येतो. आपल्या नवऱ्याची माफी मागायची होती. पण जमलेच नाही. पती परमेश्वर असतो म्हणतात मग तू मला माफ कर असा देवाशी संवाद साधत त्या प्राण सोडतात. प्रेमळ, हळव्या, सेवाभावी वृत्ती, धार्मिक

वृत्तीच्या, सहनशील, संवेदनशील मनाच्या विमलबाईंचे चित्रण रेखाटण्यात माणगावेंना यश आलेले दिसते.

**कमलाकर**

कमलाकर विमलाबाईंचे पती आहेत. ते मानसशास्त्र विषयाचे प्राध्यापक, सायकॉलॉजीचे डॉक्टर, कॉलेजमधील एक सिनीअर हेड ऑफ डिपार्टमेंट आहेत. बंगला, गाडी यांचा त्यांना अहंकार आहे.एक पती म्हणून ते चांगले नाहीत असे दिसते. लग्नाच्या चाळीस वर्षांनंतर त्यांच्या स्वभावाचा कंटाळा येवून विमलाबाई त्यांना तापट, लहरी, आपमतलबी, दुष्ट माणूस म्हणून उल्लेख करतात. छोट्या छोट्या गोष्टींसाठी ते सर्वांवर ओरडताना दिसतात. एका प्राध्यापकाच्या तोंडी शोभणार नाहीत अशा घाणेरड्या शिव्या देतात. आपल्या म्हणण्याप्रमाणे सर्वांनी वागले पाहिजे असा त्यांचा हट्ट असतो. ते दुसऱ्याच्या मनाचा विचार करत नाहीत. आत्मपरीक्षण करीत नाहीत. त्यांच्या त्रासाला कंटाळून त्यांची दोन मुले अजय-विजय घरापासून दूर राहतात. विमलाबाईदेखील त्यांच्या स्वभावाला कंटाळून वेगळ्या राहतात. एखादी गोष्ट समोरच्यास पटवून देण्यासाठी हुज्जत घालतात. त्याविरूध्द कोणी बोलले तर, त्यांच्यापेक्षा कोणी वरचढ ठरू लागले तर मागचे पुढचे काही तरी काढून घर डोक्यावर घेतात पण आपली चूक कधीच मान्य करीत नाहीत. आई वडीलांनी त्यांचे एकुलता एक म्हणून खूप लाड केले आहेत. त्यामुळे त्यांचा स्वभाव हट्टी, आपलेच म्हणणे खरे करणारा बनला आहे. त्यांनी आपल्या अशिक्षित शेतकरी आईवडीलांचा तिरस्कार केला आहे. त्यांनी त्याना इतका त्रास दिला आहे की ते हाय खावून वारले आहेत.

ते एखाद्याला क्षुल्लक कारणासाठी ओरडतात. त्यावेळेस त्याला आपल्यासमोर बसवून दहा मिनिटांपासून ते तास दोन तासपर्यंत आपल्या तोंडाचा पट्टा सोडतात. त्यांना विमलाबाई स्वतंत्र राहून आनंद उपभोगत आहेत हे पाहवत नाही. बायकोने आपला सर्व त्रास निमूटपणे सहन करून नवऱ्याला सोडून जावू नये अशी त्यांची इच्छा विचारधारा आहे. विमलाबाईंना आनंदी बघून कुठूनतरी त्यांना त्रास देण्याचा प्रयत्न करतात. विमलाबाईंना कुष्ठरोग झाल्याची

आवई उठवतात. नातवंडांना आजीला महारोग झाल्याचे सांगून तिने दिलेला खाऊ न खाण्याविषयी सांगतात. असे करताना आपण मुलांवर कुसंस्कार करतो आहोत याचा थोडादेखील विचार करत नाहीत.

विमलाबाई स्वतंत्र राहिल्यानंतर संध्या, सुरेश ही नातवंड एकत्र येवून हसतात, खिदळतात याचा त्यांना राग येतो. आपण एकटे पडलो असे वाटून याला विमलाबाई कारणीभूत आहेत. असे म्हणून त्यांना शिव्या घालतात. एका सात्विक, प्रेमळ, संवेदनशील बायकोचे मन समजून घेता त्यांना छळणाऱ्या नवऱ्याचे कमलाकरांचे व्यक्तिरेखा चितारताना त्यांचे दुर्गुणच दाखवले आहेत. सद्‌गुण क्वचितच आले आहेत.

कितीही झाले तरी ते एक माणूस आहेत. म्हणूनच विमलाबाई वारल्यानंतर त्याना पश्चाताप होतो. विमलाबाई हळव्या, संवेदनशील आहेत तर त्याच्याबरोबर उलट विक्षिप्त, आपमतलबी, भावनाशून्य कमलाकरांची व्यक्तीरेखा आहे. विमलाबाईंना सहानुभूती मिळवून देण्यासाठी नकारात्मक भूमिकेतून कमलाकरांचे व्यक्तीचित्र रेखाटलेले दिसते.

**संध्या**

विमलाबाईंची सर्वात धाकटी सून संध्या आहे. संध्याला शैलेश व दीपा ही दोन मुले आहेत. समंजस, प्रेमळ, कामसू, विचारी स्वभावाची संध्या एक चांगली गृहिणी आहे. तिचे आपल्या सासूवर नितांत प्रेम आहे. त्यांचा होणारा छळ पाहून तिला त्यांची सहानुभूती वाटते. पण त्यांच्याविषयी तिला आदर आहे असे दिसते. कमलाकरांशी त्याने भांडावे, ते शांतपणे सहन करतात म्हणून ते त्यांना छळतात असे तिचे मत आहे. विमलाबाई वेगळ्या राहिल्यानंतर घराची संपूर्ण जबाबदारी तिच सांभाळते. विमलाबाईंना जेवणाचा डबा देते. त्यांना हवं नको ते विचारते. त्यांची आस्थेने चौकशी करते. ती अत्यंत स्वाभिमानी आहे. नवऱ्याने काढलेले अपशब्द ती सहन करू शकत नाही. ती स्वत:चे हक्क व कर्तव्ये याविषयी जागरूक आहे असे दिसते. कमलाकर तिच्याशी कितीही वाईट वागले तरी त्यांच्या आजारपणात ती त्यांचं सर्व काही करते. सासू-सासऱ्याची काळजी घेते. विमलाबाईंच्या

मृत्यूमुळे तिला खूप दु:ख होते. ती कमलाकरांना दोष देते. त्यांच्यावर चिडते तरीही त्यांच्या खाण्यापिण्याची सोय करते यातून तिच्या मनाचे मोठेपण दिसते.

**सुरेश**

सुरेश विमलाबाईचा धाकटा मुलगा आहे. तो स्वभावाने आपल्या आईप्रमाणे प्रेमळ, हळवा, संवेदनशील आहे. आपल्या वडीलांचा विचित्र स्वभाव त्याला चांगलाच ठाऊक आहे. त्यामुळे जेव्हा त्याची आई आऊटहाऊसमध्ये राहण्याची इच्छा व्यक्त करते तेव्हा तो तिला मदत करतो. तो आईच्याबाजूने बोलतो. तेव्हा कमलाकर त्यालाही घराबाहेर काढण्याच्या गोष्टी करतात. तेव्हा गावचे घर, शेत विकून हे घर बांधले असल्याने या घरावर माझाही हक्क आहे असे ठामपणाने सांगतो. असे असले तरी सुरेशचे आईवडीलांवर खूप प्रेम आहे. तो मोठा झाला तरी आईच्याताटात जेवतो. आईला भरवतो. तिने आपल्याला भरवावे अशी इच्छा व्यक्त करतो. वडीलांनी त्याला याबद्दल सुनावले तरी याकडे लक्ष देत नाही.

सुरेशला भाकरीपेक्षा चपाती जास्त आवडते. लहानपणी एकदा आईने भाकरी वाढली असता दारावर पण्डित चरू मागायला येतात तेव्हा त्यांच्याकडील चपाती घेवून आपली भाकरी त्याच्या ताटात टाकतो. आईने याविषयी विचारले असता आईकडे प्रामाणिकपण मान्य करतो.

सुरेशला आईने कुष्ठरोग्यांच्या वसाहतीत जाणे आवडत नाही. तो त्याबद्दल तिला सांगतो. आई आपले ऐकत नाही हे पाहून तिच्याबरोबर तुसडेपणाने वागतो. कमलाकर आजारी असताना त्यांना जर कमी जास्त झाले तर तुला आनंदच होईल असे कठोरपणे बोलतो. पुरूषप्रधानता असल्यामुळे आपल्याला आवडेल असेच आईने वागले पाहिजे असे त्याला वाटते. समाजव्यवस्थेचाच हा परिणाम दिसतो. आई वारल्यानंतर मात्र तो स्वत:लाच दोष देत राहतो. सुरेश कष्टाळू, संवेदनशील, प्रेमळ स्वभावाचा आहे. तो आपल्या आईवडिलांची आयुष्यभर काळजी घेताना दिसतो.

**धनंजय**

विमलाबाईंचा सख्खा धाकटा भाऊ आहे. धनंजय व विमलाबाईंचे नाते लहानपणी होते तसेच दृढ व प्रेमाचे आहे. ते कमलाकरांच्यासमोर विमला म्हणतात तर एकांतात विमले, विमली, विमे अशा नावाने हाका मारतात. त्यात त्यांना आपलेपणा वाटतो. विमलाबाई जेव्हा वेगळ्या राहतात तेव्हा ते त्यांना भेटायला येतात. त्यांची समजूत घालून परत आपल्या घरात जायला सांगतात. त्यांचा स्वतंत्र राहण्याचा दृढ निश्चय पाहून कुठेही रहा पण सुखात रहा असे सांगून निघून जातात.

विमलाबाईंनी कुष्ठरोग वसाहतीत जावू नये हे त्यांना समजावून सांगण्यासाठी कमलाकर व सुरेश धनंजय यांना बोलावून घेतात. विमलाबाई जेव्हा पूर्ण सत्य सांगतात आपल्याला त्या वसाहतीत जाण्यासाठी कमलाकर कसे जबाबदार आहेत हे सांगितल्यावर धनंजय कमलाकर व सुरेश यांच्यावर चिडतात. त्यांना न भेटताच निघून जातात. जाताना आपला खिसा त्यांच्याकडे रिकामा करून त्यांच्याकडे जेवढे पैसे आहेत तेवढे विमलाबाईना देतात.

धनंजय धार्मिक वृत्तीचे आहेत. जेव्हा विमलाबाई गंदोधकाची वाटी त्याच्यासमोर ठेवतात तेव्हा टोपी काढून देवाला नमस्कार करून गंदोधक डोक्यावरून ओला हात फिरवतात यातून त्यांची धार्मिक वृत्ती दिसून येते. विमलाबाईंच्या मृत्यूनंतर ते हळहळतात. आपण तिला कधी घरी नेले नाही, आपण तिचे रक्षण करू शकलो नाही म्हणून स्वत:ला दोष देत राहतात. आपल्या बहिणीवर नितांत प्रेम करणारे धनंजय हे व्यक्तिचित्रण प्रभावीरित्या चित्रित केले आहे.

**गौणपात्रे**

**अजय व विजय**

अजय व विजय ही दोन्ही विमलाबाईंची मुलं आहेत. अजय हा थोरला व विजय मधला मुलगा आहे. हे दोघे कमलाकरांच्या धाकात वाढलेली आहेत. त्यांच्या स्वभावाला कंटाळलेली आहेत. थोडे स्वावलंबी झाल्यावर दोघेही घरापासून दूर राहतात. पण आईने

स्वतंत्र राहिलेले त्यांना आवडत नाही. अजय त्यांना पत्र पाठवून नवऱ्याला सोडून राहणे चांगले नाही. असे कळवतो. स्वत:कडे नेण्याची इच्छा दर्शवितो पण न्यायला येत नाही. विजय स्वत: येवून त्यांच्या सामानाची बांधांबांध सुरू करू लागतो. विमलाबाईंचा तिथेच राहण्याचा निर्णय ऐकून हतबध्द होतो. दोघांनाही आईची काळजी नाही. लोक काय म्हणतील याचा विचार आहे. दोघेही त्यांना तिर्थक्षेत्री जावून राहण्याचा विचार सांगतात. विमलाबाई वारल्यानंतर ते सुरेश व संध्याला दोष देतात. सर्व काही माहीत असूनही संध्या व सुरेशला कसेही बोलतात. दोघेही स्वार्थी, आपमतलबी, बेजबाबदार, आईवडिलांची जबाबदारी नको अशा वृत्तीचे आहेत. अजयची बायको सारीका व विजयची नीला याही त्यांच्यासारख्याच आहेत असे दिसते.

**डॉ. उत्तम**

सुवर्णाची सून डॉ. उत्तम ही पेश्याने वैद्य आहे. बॉबकट असलेली, गोरीपान, पाहताच समोरच्यावर छाप पाडणारी उत्तम आधुनिक विचाराची आहे. मासिक पाळीच्यावेळी लांब बसायला सांगणाऱ्या सासूचे ती ऐकत नाहीत. ती वैद्यकीय व्यवसायात असल्याने मासिक पाळी व देवधर्म याचा काडीचाही संबंध नाही हे ती सासू व नवऱ्याला पटवून सांगते. पण तिचे कोणी ऐकत नाही. यामुळे घरात वाद होतात. मासिक पाळी पुढे ढकलण्यासाठी बायका गोळ्या खातात त्यामुळे त्यांच्या गर्भाशयास इजा पोहचते म्हणून माझ्या मनाला जे पटणार नाही ते मी करणार नाही. हे सासूला ती ठामपणे सांगते. सुमन व रेखा यांनी समजून सांगितल्याने उध्वस्त होणारा संसार वाचविण्यासाठी स्वत:च तयार होते. शाळेतील मुलांची मोफत आरोग्य तपासणी करण्यासाठी आनंदाने राजी होते. सुशिक्षीत, सुसंस्कारीत, समंजस, विचारी, उत्तम ही व्यक्तिरेखा आधुनिक स्त्रीचे उत्तम उदाहरण दिसते.

**रेखा व सुमन**

रेखा ही गरीब घरात वाढलेली विधवा आहे. तिची सासू तिचा छळ करत असल्याने तिने स्वतंत्र संसार थाटला आहे. ती कर्तृत्ववान आहे. मनमोकळी धडपडणारी धाडसी आहे. ती नियमितपणे महिलामंडळात जाताना दिसते.

सुमन देसाई या ऐरावती महिला मंडळाच्या अध्यक्षा आहेत. विमलाबाई त्यांच्या महिला मंडळात जातात. तेव्हा त्या मोठ्या मनानं त्यांचे स्वागत करतात. तुमच्यासारख्या थोरामोठ्यांच्या सल्ल्याची गरज आम्हाला आहे असे म्हणतात. त्या महिला मंडळात धार्मिक व्याख्यानाबरोबर हळदीकुंकू, दांडीया, पार्लर, केटरींग, योगासने आरोग्य साधने, अंधश्रध्दा निर्मूलन इत्यादी कार्यक्रम घेताना दिसतात. गावातील अन्यायाविरूध्द आवाज उठवून अन्यायग्रस्त व्यक्तीला न्याय मिळवून देण्यात पुढे असतात. विधवा, परित्यक्त्या, निराधार स्त्रियांसाठी पापड, लोणचे, शेवया, मेतकूट, फराळाचे जिन्नस यांच्यामाध्यमाद्वारे त्यांनी रोजगार उपलब्ध करून दिला आहे.

डॉ. उत्तमचा प्रश्न सोडवण्यासठी विमलाबाईंचा सल्ला घेण्यासाठी त्यांच्या घरी येतात. त्यांच्या मनात विमलाबाईंच्याविषयी नितांत आदर आहे. त्यांना होणारा मानसिक त्रास पाहून त्यांना वाईट वाटते. विमलाबाईंच्या खोलीत जावून त्यांना कुष्ठरोग झालेला नाही हे सर्व बायकांना खात्री पटल्याचे सांगण्यासाठी त्या विमलाबाई बोलतील याची वाट पाहत राहतात. पण त्या वारलेल्या आहेत हे लक्षात आल्याने हळहळताना दिसतात.

**तळीराम**

कुष्ठरोग वसाहतीत सर्वांचे दु:ख आपली समजून सोडवण्यासाठी धडपडणारा, कुष्ठरोगी वसाहतीचे प्रतिनिधीत्व करणारा तळीराम आहे. कुष्ठरोग्यांना घर, नोकरी, शिक्षण मिळावे, त्यांचे प्रश्न सुटावेत म्हणून तो मंत्र्यांपर्यंत जायची हिंमत त्याच्याजवळ आहे. नगरपालिकेतील लोकांना तो अडचणीत आणत होता. त्यामुळे सर्वजण फक्त त्याला घर बांधून देण्याचे आमिष दाखवीत होते. पण तो ऐकत नव्हता. मला एकट्याला घर नको. ‘‘सगळ्या वसाहतीतील लोकांना घरं मिळाली पाहिजेत. मी गेलो तर ही लोक कुणाचं तोंड बघतील?’’[१७] असा विचार तो करीत होता. त्यातून त्याचा नि:स्वार्थीपणा दिसून येतो. कुष्ठरोग्याकडे डॉक्टरांनी दुर्लक्ष केले तर तो मोठ्या डॉक्टरांपर्यत दाद मागायला जात असे. त्यामुळे त्याला घेतल्याशिवाय कोणीही दवाखान्यात जात नसे. एकदा कुष्ठरोगी उमा बाळंतीण होवून बेशुध्दपडली. तिला घेवून तो दवाखान्यात आला पण तिच्या जखमा पाहून डॉक्टर निघून

गेले. त्यात उमा व तिचे बाळ दोन्हीही वारले. त्याने खूप दंगा केला पण काहीही उपयोग झाला नाही. तरीही तळीरामाच्या शब्दांना मान होता. तो वसाहतीचा प्राण होता. त्याच्यामुळे वसाहतीत एकोपा होता. विमलाबाईंचा तो नितांत आदर करताना दिसतो.

चंदर, गंगा, सुनिल, राणी, गणपा, प्रकाश, अनिल शिंदे, दिलीप, विमलांबाईंना आपल्या रिक्षातून सोडणारा रिक्षावाला इ. व्यक्तिचित्रे प्रभावीपणे रेखाटताना माणगावे यांना यश आले आहे असे दिसते.

**घटना व प्रसंगांची मांडणी**

कादंबरी ही कथानक परिपोषक वातावरण यामधून आकाराला येत असते. कथानकात घटना व प्रसंग यांची मांडणी यथोच्छित केली असेल तर या कादंबरीची परिणामकारकता वाढत असते. माणगावे यांनी मृत्युदंड या कादंबरीत फ्लॅशबॅक पद्धतीचा वापर केलेला दिसतो. विमलाबाई आपले मन मोकळे करण्यासाठी डॉक्टरकडे जातात. या प्रसंगातून कादंबरीला सुरूवात झालेली आहे. नंतर विमलाबाईंचा कमलाकरांनी केलेला छळ, त्यांना आऊटहाऊसमध्ये राहू द्यायचे की नाही याविषयावरून कौटुंबिक वादाचा प्रसंग सुरेश व विमलाबाई यांचा एकत्र जेवणाचा भावूक प्रसंग, विमलाबाईंचा आत्महत्या करण्याचा प्रयत्न इ. विविध घटना प्रसंगांची गुंफण केलेली दिसते. मृत्युदंड कादंबरीत काही हृदयस्पर्शी, काही भावूक चित्तथरारक, मनाला चटका लावणारे, वाचकांना विचार करायला लावणारे प्रसंग आलेले दिसतात. उदा. ''कुष्ठरोगी वसाहतीतील लहुची बायको उमा हिच्या बाळंतपणाचा प्रसंग, औषधालाही तिचा रोग दाद देत नव्हता. जखमा वाढत गेल्या होत्या, पू होत होता. अशातच ती पोटोशी झाली. नऊ महिने व्हायच्या आतच ती एका रात्री बाळंतीण झाली. कुणाला तिनं हाकसुद्धा दिली नाही. सारे बाहेर पडताच खलबत्यातल्या दगडानं तिनं नाळ ठेचून काढली. लुगड्याची चिंधी पोराच्या नाळेला बांधली आणि स्वत:ची वार बाहेर खेचू लागली. वार लांबू लागली पण बाहेर येईना. प्राणांतिक वेदनांनी ती बेशुद्ध पडली.''[१८]

अशाप्रकारे माणगावे शब्दांच्या माध्यमातून प्रसंग जिवंत करतात. तो प्रसंग जणू डोळ्यासमोर घडत आहे असे वाटत राहते. लिखिकेने घटना व प्रसंगांची मांडणी योग्य रितीने करून कादंबरी वाचनीय बनवलेली दिसते.

**भाषाशैली**

प्रत्येक व्यक्तीची भाषा ही वेगवेगळी असते. प्रांतानुसार, व्यवसायानुसार, स्वभावानुसार प्रत्येकाच्या भाषेत बदल होताना दिसतात.

मृत्युदंड कादंबरीतील विक्षिप्त, तिरसट स्वभावाचे कमलाकर कधीही मवाळ, प्रेमळ बोलताना दिसत नाहीत. नेहमीच खेकसून, ओरडून बोलताना दिसतात. त्यांच्या तोंडात घाणेरड्या शिव्यादेखील असतात. उदा. इकडे धनंजय न सांगताच गेल्याचे दिसताच कमलाकरांचा राग मस्तकात गेला.

''नालायक लेकाचा! सुकाळीचा न सांगता गेला. बहिणीच्याच अवलादीचा! हालकट! मॅनर्स आहेत की नाही याला? साधं सांगूनही जायची अक्कल नाही याला! यालाच अक्कल नाही बहिणीला काय शिकवणार? शेण?

डुंगणावर लाथ घालून हाकलून दिली बहिणीला म्हणजे समजेल! कुतरडा कुठला?''[१९]

अशाप्रकारची कमलाकरांच्या स्वभावाला शोभेल अशी भाषा वापरलेली दिसते.

काही ठिकाणी मात्र ढोबळ संवाद दिसून येतात. उदा. ''एकटं वाटतं ना रोज जेवताना?''

''हो रे! जात नाही जेवण. आठवण येते तुमची!''

''मग यायचं! घर तुझचं आहे.''

''नाही रे! ते घर माझं कधीच नव्हतं.''

''हे तर आहे ना?''

''आहे! हे घर मला माझं वाटतं!''

''तू सुखात आहेस ना?''[२०]

उत्खन्नात सापडलेल्या वस्तूंसारखा चेहरा मोहरा बदलून सामोरा आला होता.

राखेतून उडणारा फिनिक्स ही केवळ कल्पना होती. पण चिखलातून उमलणारे कमळ ही तर वास्तवता. जंगलालाच आग लागली. पेलाभर पाणी कसं पुरणार, मुसळधार पाऊस कोसळावा आणि ढग रिते होतात. आकाश मोकळं व्हावं, कोंदटलेपण कुठल्या कुठं पळून जावं असं वाटलं त्यांना. इ. उपमांचा वापर करुन आशयाला उठावदारपणा आणलेला दिसतो.

हिंदी व मराठी म्हणी वापरलेल्या दिसतात. 'एक घर सुना तो दस घर भिक्षा', 'जावे त्यांच्या वंशा', 'धरलं तर चावतंय सोडलं तर पळतंय', 'आंधळं दळतं कुत्रं पीठ खातं.' इ.

हिंदी, इंग्रजी व संस्कृत शब्द आलेले दिसतात. उदा. साली खाली पिली तकलीफ, एज्युकेशन, सायकॉलॉजी, हेड ऑफ डिपार्टमेंट इ. 'दया मुलस्य धर्म:' परस्परापग्राहो जीवनाम अशी संस्कृत वाक्येही आलेली दिसतात. जैनधर्मीय पाश्वभूमी लाभलेली असल्याने चरू, हलदारी, पण्डित इत्यादी जैन समाजातील शब्द आलेले आहेत. त्याचबरोबर

''संशुद्धशुद्धया परिहारशुद्धया
कर्पूर सांमिश्रीत चंदतेन
जितेंद्र देवं सुरपुष्पवृष्टी
विलेपनं चारू करोमि भक्त्या!''

अशाप्रकारे संस्कृत श्लोकचा वापर करून आशय परिणामकारक रित्या मांडलेला दिसतो. कुष्ठरोगी माणसं ही अज्ञानी, अशिक्षित आहेत. त्यांच्या तोंडची भाषा साजेशी आहे असे दिसते. उदा. ''म्हंजे आमच्या बाईसाहेबचं देवमाणूस म्हणायच्या! ह्या माणूस..... ह्योच राक्षस निघाला व्हय? तळीराम म्हणाला, देव माणूस आमच्या बाई हुत्या! बाई ह्यानला तुम्ही का मोठं केलसां व्ह?''[२१]

छोटी छोटी वाक्य, सहज साधा संवाद, निरअलंकृत भाषा, स्वभावानुसार व्यक्तींची भाषा वापरणे ही त्यांच्या भाषेची वैशिष्ट्ये दिसतात.

**वातावरणनिर्मिती**

कादंबरीत वातावरण निर्मितीला फार महत्त्व असते. याबाबत डॉ. मदन कुलकर्णी लिहितात, "ऐतिहासिक व सामाजिक कादंबऱ्यांमध्ये तर पार्श्वभूमीला कथानक व व्यक्तिदर्शना इतकेच महत्त्व प्राप्त होते."[२२] 'मृत्युदंड' कादंबरीतील वातावरण जैन कुटुंबातील आहे. धार्मिकता, कौटुंबिकता व त्यातून घडणारी सामाजिकता व त्याचबरोबर कुष्ठरोग्यांचे दु:ख, वेदना यांचे जीवनचित्रण या कादंबरीत आलेले दिसून येते.

कमलाकर विचित्र लहरी स्वभावाचे असल्याने त्यांच्या कुटुंबातील वातावरण धास्तावलेले व भेदरलेले असे आहे. छोट्या छोट्या कारणांसाठी मुलांना ते शिव्या देतात. प्रसंगी ते चपलीने मारतात त्यामुळे मुले त्यांच्या जाचाला कंटाळेलेली आहेत. विमलाबाई कमलाकरांपासून वेगळ्या राहिल्यातरी त्यांच्याबद्दल अपशब्द बोलत नाहीत. मुलांच्या मनावर चांगले संस्कार करताना दिसतात. यातून मृत्युदंड कादंबरीतून कौटुंबिक वातावरण दिसते.

कुष्ठरोगी वसाहतीतील वातावरण चित्रित करण्यात लेखिकेला यश आल्याचे दिसते. कुष्ठरोग्यांचे जीवनचित्रण, त्यांच्या मुलांची दु:खं, त्यांच्यातील हेवेदावे, संघर्ष भांडणं, पावसाळ्यातली उडणारी त्यांची त्रेधातिरपीट इत्यादी वातावरण लेखिका शब्दांच्या माध्यमातून ठळकपणे चित्रीत करताना दिसतात. उदा. "देवळासमोर, स्टॅण्डसमोर बाजारात, ओळीने बसू लागली. लोकांच्या तुच्छ, तिरस्कारयुक्त नजरा झेलत झेलत हात पसरू लागली. रोज शेजारी बसता बसता ठराविक ठिकाणी अर्थातच गावाबाहेर, मनुष्य वस्तीपासून दूर राहू लागली आणि त्यांची एक जमातच तयार झाली. लग्न, मुल बाळ, कुटुंब तो काय कुणाला चुकला आहे? पोटाबरोबरच शारीरिक भूक भागवताना वस्ती वाढली, विंचवाचं बिऱ्हाड पाठीवर बांधून अनेक जागा बदलून ही खोपटी आता हायवेच्या उजव्या बाजूला राहिली होती."[२३] अशाप्रकारे त्यांचे दु:ख चित्रित करण्यात माणगावेंना यश आलेले दिसते.

विमलाबाई उठता बसता 'अरिहंत भगवंता!' म्हणतात. संकटाच्यावेळी णमोकार मंत्र जपतात. मैनासुंदरी आख्यान लेखिका मधेमधे धार्मिक अंधश्रध्देवर भाष्य करताना दिसतात. देऊळ बांधण्यासाठी लाखो रूपये खर्च करण्याऐवजी गरीबांना अर्थसहाय्य केलेले चांगले असे

पुरोगामी विचार मांडताना दिसतात. नीलम माणगावे यांनी मृत्युदंड कादंबरीत सामाजिक, कौटुंबिक, धार्मिक वातावरण याचे चित्रण प्रभावीपणे केल्याचे दिसते.

### निवेदनशैली

नीलम माणगावे यांनी मृत्यूदंड कादंबरीच्या निवेदनासाठी तृतीय पुरूषी निवेदन पध्दतीचा वापर केलेला दिसतो. यामुळे त्यांना व्यक्ती दर्शनात विविधता आणून कथानकाची रंजकता वाढवल्याचे दिसते.

निवेदनात मधेमधे आठवणी सांगितल्या आहेत. तसेच संवादाचा वापर केलेला दिसतो. उदा. ‘‘विरोध केल्याचा परिणाम काय भोगावा लागतो हे त्या बिचारीला कसे समजणार?’’

एकदा विमलाबाईंनी उलटा वाद घातला होता. नवरा मारायला येताच ‘‘मारा! मारा एकदा!’’ चिडून त्या म्हणाल्या,

‘‘ मारून टाका म्हणजे सुटेन मी एकदाची,’’ पण न मारता त्यांनी वेगळ्याच प्रकारे धडा शिकवला होता. बायकोला घराबाहेर काढून त्यांनी दार लावून घेतले होते. करकरीत तिन्ही सांजेला घरच्या लक्ष्मीला बाहेर काढताना त्यांना काहीच वाटले नव्हते.’’[२३] नीलम माणगावे यांचे निवेदन प्रभावी व ओघवते असल्याचे दिसते. सहजता, सुसूत्रता, साधेपणा ही त्यांच्या निवेदनाची वैशिष्ट्ये दिसून येतात.

### समारोप

प्रस्तुत प्रकरणात मृत्युदंड या सामाजिक कादंबरीतील रूढी, परंपरा विमलाबाईंनी नवऱ्याचा निमूटपणे सहन केलेला त्रास, त्याचप्रमाणे वेगळे राहून परंपरेला छेद देण्याचा प्रयत्न, कुष्ठरोग्यांचे जीवनचित्रण यांचा अभ्यास केला आहे. लेखिकेने मानवी भावभावनांचे नातेसंबंधोच प्रभावी चित्रण केलेले दिसते. पण स्त्री बद्दल सहानुभूती मिळविण्यासाठी त्या पुरूषांना दुष्ट दाखवितात. विमलाबाईंना सहानुभूति मिळवून देण्यासाठी त्यांनी कमलाकरांनी अतिशय दुष्ठ, स्वार्थी दाखविले आहे. काहीशा नकारात्मक दृष्टीकोनातून ही कादंबरी लिहीली

आहे असे वाटते. त्यांचे लेखन कलात्मकतेची उंची गाठताना दिसत नाही. कल्पनारम्यता अधिक जाणवते. पुनर्रावृत्तीचा दोष दिसतो.

घटना, प्रसंगाचे वर्णन प्रभावीपणे केल्याचे दिसते. त्यांच्या कादंबरीतील स्त्रिया शोषिक, हळव्या आहेत. जैन समाजातील व्हासा, अष्टक, हलदारी इत्यादी शब्द आलेले दिसतात. तसेच संस्कृत श्लोक, इंग्रजी, हिंदी शब्दांचा वापर करून आशय परिणामकारक रित्या मांडल्याचे दिसून येते.

कुष्ठरोग्यांचे जीवन चित्रण करताना त्यांच्या राहण्याचा, शिक्षणाचा, मुलांचा प्रश्न मांडलेला दिसतो. यातून त्यांची सामाजिक जाणीव स्पष्ट होते.

## संदर्भ-सूची


१. माणगावे, नीलम : मृत्युदंड, शालीन प्रकाशन, सांगली, प्र. आ. २००६, पृ. क्र. १०-११.

२. तत्रैव, पृ. क्र. १८०.

३. तत्रैव, पृ. क्र. १५४.

४. तत्रैव, पृ. क्र. ११६.

५. तत्रैव, पृ. क्र. ११.

६. कोकाटे, गुंफा : स्त्रीवादी समीक्षा दृष्टितून सानियाचे साहित्य, नवभारत, फेब्रुवारी २००५, पृ. क्र. ३४.

७. माणगावे, नीलम : मृत्युदंड, शालीन प्रकाशन, सांगली, प्र. आ. २००६, पृ. क्र. २०-२१.

८. तत्रैव, पृ. क्र. ४८.

९. तत्रैव, पृ. क्र. ४९.

१०. तत्रैव, पृ. क्र. ८६.

११. तत्रैव, पृ. क्र. ११०.

१२. तत्रैव, पृ. क्र. १२६.

१३. तत्रैव, पृ. क्र. ११६.

१४. तत्रैव, पृ. क्र. १२.

१५. तत्रैव, पृ. क्र. ४६.

१६. फडके, ना. सी. : प्रतिभासाधन, आ. ७ वी, मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे.

१७. माणगावे, नीलम : मृत्युदंड, शालीन प्रकाशन, सांगली, प्र. आ. २००६, पृ. क्र. १०-११.

१८. तत्रैव, पृ. क्र. १६८-१६९.

१९. तत्रैव, पृ. क्र. १५८.

२०. तत्रैव, पृ. क्र. ६६.

२१. तत्रैव, पृ. क्र. १८९.

२२. डॉ. कुलकर्णी, मदन : मराठी प्रादेशिक कादंबरी तंत्र आणि स्वरूप, मंगेश प्रकाशन, नागपूर, पृ. क्र. ८.

२३. माणगावे, नीलम : मृत्युदंड, शालीन प्रकाशन, सांगली, प्र. आ. २००६, पृ. क्र. १८७.